PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Gadbad Ghotala
Year: 1986

Song: Tujhi majhi naate
Lyricist:

तुझे माझे नाते राजा रातीला जडे
स्वप्नांच्या या वाटेवरी पाऊल पुढे
ओठाचा हा प्याला आज ओठाशी भिडे
लावूनी हे पंख मन आकाशी उडे
सजणा ये ना
तालावरी ताल असा झोकात पडे
बेहोशीच्या लाटेवरी लाट ही चढे
मिठीमध्ये धुंदीची गं जादू ही घडे
गुलाबी ह्या रंगामध्ये रात ही बुडे
जवळी ये ना

ये ना अशी बाहूपाशी
राहतेस का दूर दूर
नशा झुले प्रीती फुले
लागे जीवा हुरहूर
ये ना अशी बाहूपाशी
राहतेस का दूर दूर
नशा झुले प्रीती फुले
लागे जीवा हुरहूर
स्वर्गाचीही सुखं आता आपुल्याकडे
तुझा हात हाती माझे पाऊल पुढे
मिठीमध्ये धुंदीची गं जादू ही घडे
गुलाबी ह्या रंगामध्ये रात ही बुडे
जवळी ये ना
तुझे माझे नाते राजा रातीला जडे
स्वप्नांच्या या वाटेवरी पाऊल पुढे
ओठाचा हा प्याला आज ओठाशी भिडे
लावूनी हे पंख मन आकाशी उडे
सजणा ये ना

तुझ्यासाठी माझी मिठी
रात करू चंदनी
ये ना प्रिये काय हवे
या रेशमी बंधनी
तुझ्यासाठी माझी मिठी
रात करू चंदनी
हां ये ना प्रिये काय हवे
या रेशमी बंधनी
काळजाला काळजाची माया ही जडे
नजराणा तारूण्याचा आणिला पुढे
ओठाचा हा प्याला आज ओठाशी भिडे
लावूनी हे पंख मन आकाशी उडे
सजणा ये ना
तालावरी ताल असा झोकात पडे
बेहोशीच्या लाटेवरी लाट ही चढे
मिठीमध्ये धुंदीची गं जादू ही घडे
गुलाबी ह्या रंगामध्ये रात ही बुडे
जवळी ये ना

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*